# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**एमएमआरडीए वसाहत, एसआरए प्रकल्प वसाहत, वाशीनाका चेंबूर आणि शिवशाही पुनर्वसन प्रकल्प वसाहत, महाराष्ट्रनगर मानखुर्द या इमारतींच्या दुरुस्तीबाबत व दैनंदिन नागरी सुविधांबाबत**

**(१) १९६३४ (११-०८-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमएमआरडीए वसाहत, एसआरए प्रकल्प वसाहत, वाशीनाका चेंबूर आणि शिवशाही पुनर्वसन प्रकल्प वसाहत, महाराष्ट्रनगर मानखुर्द या इमारतींच्या दुरुस्तीबाबत व दैनंदिन नागरी सुविधांबाबत दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजीचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पालकमंत्री मुंबई उपनगर जिल्हा यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) वसाहतीमधील अंतर्गत दुरुस्त्यांबाबतची जबाबदारी ही प्रामुख्याने त्या वसाहतींची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झालेली असल्यास अशा संस्थांची/फेडरल सोसायटयांची राहणार आहे. शिवशाही पुनर्वसन प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र नगर मानखुर्द येथील प्रकल्पबाधितांसाठी बांधलेल्या वसाहतीमधील बांधलेल्या वसाहतीमध्ये नियमानुसार मोकळी जागा, बालवाडी, पाणीपुरवठा व्यवस्था, सांडपाणी मलनि:सारण वाहिनी व्यवस्था, पायवाटा रस्ते, पथ दिवे वगैरे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. या वसाहतीमधील शाळा व नर्सिंग होम यासाठी राखीव असलेले भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतर करण्यात आलेले आहेत. सदर वसाहतींना दैनंदिन नागरी सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत नियोजन प्राधिकरणांना सूचना देणेत येत आहेत.

---

## पुणे महापालिकेची शासनाकडे सुमारे ४४५ कोटी रुपयांची कर आणि अनुदानाची थकबाकी असल्याबाबत

**(२) २९८२४ (२१-०१-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेची गेल्या १० वर्षापासून शासनाकडे सुमारे ४४५ कोटी रुपयांची कर आणि अनुदानाची थकबाकी असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ४४५ कोटी रुपयांची कर आणि अनुदानाची रक्कम पुणे महापालिकेला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७) :** (१) व (२) महानगरपालिकांना विविध योजनेअंतर्गत शासनस्तरावरुन अनुदाने वितरीत करण्यात येतात. योजनेचे निकष, उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद याबाबी विचारात घेवून पुणे महानगरपालिकेला अनुदाने वितरीत करण्यात आलेल आहे. शासनाकडून महानगरपालिकेला येणे व देणे रकमा याबाबत रकमा समायोजित करण्याची कार्यवाही करण्यात येत असते. सबब, शासनाकडे रु. ४४५ कोटी थकबाकी आहे अशी बाब नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पोलिसांच्या निवासी/कार्यालयीन इमारती व नक्षलग्रस्त भागातील पोलिसांच्या कार्यालयीन इमारतीच्या बांधकामाबाबत

**(३) ३०१६५ (२२-१२-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिसांच्या निवासी/कार्यालयीन इमारती व नक्षलग्रस्त भागातील पोलिसांच्या कार्यालयीन इमारतीच्या बांधकामात गेल्या १० वर्षात (सन २००५-२०१५) या कालावधीत विविध प्रस्तावांतर्गत हजारो कोटी रुपयांचा निधी वितरित झाल्याचे दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित निधीचा लेखा सार्वजनिक बांधकाम विभागाने पोलीस महासंचालक यांचेकडे पाठविण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने निधीचा लेखा न पाठविण्याची कारणे काय, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, आतापर्यंत किती पोलिसांच्या निवासी/कार्यालयीन इमारती व नक्षलग्रस्त भागातील पोलिसांच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१७) :** (१) पोलीसांच्या निवासी / कार्यालयीन इमारती, पोलीस प्रशिक्षण निवासी / कार्यालयीन इमारती, नक्षल भागातील पोलीसांच्या कार्यालयीन इमारती यांसाठी सन २००५-२०१५ या कालावधीत सुमारे रु. २००२.७६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(२) व (३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून लेख्याबाबतची माहिती संबंधित घटक प्रमुख यांच्याकडे सादर करण्यात येते.

(४) सन २००५ ते मार्च, २०१५ या कालावधीत पूर्ण करण्यात आलेल्या प्रकल्पांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| निवासी इमारती | कार्यालयीन इमारती | नक्षलग्रस्त भागातील कार्यालयीन इमारती |
|---|---|---|
| ४३८ | ५४७ | ३६ |

---

**मुंबईच्या सर्वांगिण विकासासाठी केंद्र शासनाकडून येणाऱ्या निधीतून**
**१० टक्के निधी राखीव करण्याबाबत**

**(४) ३०५०१ (२१-०१-२०१६). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या सर्वांगिण विकासासाठी केंद्र शासनाकडून येणाऱ्या निधीतून १० टक्के निधी राखीव करण्याबाबत मुंबईतील लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ मार्च, २०१५ रोजीच्या पत्राद्वारे मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**ठाणे शहर झोपडपट्टीमुक्त करण्याबाबत**

**(५) ४१८८९ (०५-०५-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहर झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी महापालिकेने सर्व प्रस्ताव एसआरएकडे हस्तांतरीत केले, मात्र एसआरएचे काम अद्यापही सुरु झाले नसल्याने सर्व प्रकल्पांचे काम ठप्प झालेले असल्याने या प्रकरणी तातडीने एसआरएची अंतिम अधिसुचना काढून ठाणे कार्यालयाचे कामाकाज सुरु करण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांना माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात तसेच वारंवार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी केलेल्या मागणीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, तसेच शहरातील झोपडपट्टीवासीयांना घरे उपलब्ध करुन देण्यासाठी एसआरए प्रकल्पांची कामे युध्दपातळीवर सुरु करुन पुर्ण करण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०७-२०१७) :** (१) व (२) शासन अधिसूचना दि. ११.०९.२०१४ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई च्या क्षेत्रामध्ये ठाणे महानगरपालिका क्षेत्राचा समावेश करण्यात आला आहे. त्यानंतर ठाणे येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे कार्यालय सुरु करण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून करण्यात आलेली होती.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे कार्यालय, ठाणे येथील खेवरा सर्कल, मानपाडा येथे दि. ०८.०४.२०१६ पासून सुरु करण्यात आले आहे.
(३) यापूर्वीचे ठाणे महानगरपालिकेकडील झोडपट्टी पुनर्विकास योजनांचे प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आले आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे या कार्यालयामार्फत झोपडपट्टी पुनर्वसन योजना संबंधिचे कामकाज वेगवेगळ्या टप्प्यांवर सुरु आहे.

---

## संगमनेर नगरपरिषदेचे (जि.अहमदनगर) येथे गुंठेवारी चालू करावी किंवा रहिवाशी क्षेत्रातील बांधकामांना परवानगी मिळण्याबाबत

**(६) ४२६८२ (१७-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमनेर नगरपरिषदेच्या (जि.अहमदनगर) उत्पन्न वाढीसाठी गुंठेवारी चालू करावी किंवा रहिवासी क्षेत्रातील बांधकामांना परवानगी मिळण्यासाठी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधित विभागास वारंवार मागणी करण्यात येऊनही अदयापी याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७) :** (१) व (२) गुंठेवारीसंबधी शासनाने पारीत केलेल्या महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ नुसार १ जानेवारी, २००१ पर्यंतची गुंठेवारीची प्रकरणे ३१ मार्च, २००३ पर्यंत नियमाधीन करणेचे नमूदे केले आहे. २००१ पूर्वीचे गुंठेवारी प्रकरण नियमाधीन करणेसाठी गुंठेवारी अधिनियम २००१ चे कलम ४ अन्वये संबंधीत प्लॉटधारकाने सदर अधिनियम लागू झाल्याच्या दिनांक ३० एप्रिल,

२००१ या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत अथवा नियोजन प्राधिकरण परवानगी देईल अशा वाढीव वेळेत प्रस्ताव दाखल करणे नमूद केलेले आहे.

संगमनेर नगरपरिषदकडे २००१ नंतरची गुंठेवारी चालू करण्याची मागणी होत असल्याने तत्कालीन जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी सन २००१ नंतरची गुंठेवारी नियमाधीन न करण्याचे पत्र दिले आहे. त्यामुळे संगमनेर नगरपरिषदेने सन २००१ नंतरची गुंठेवारी चालू करणेचा सर्वसाधारण सेभेचा दि. १२/०२/२०१३ रोजी पारित केलेला ठराव क्र.२७८ हा मुख्याधिकारी, नगरपरिषद यांनी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या कार्यालयाकडे महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायत, औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ चे कलम ३०८ अन्वये, तहकूब करण्यास्तव सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) शहरातील दलित वस्तीमधून लेंडीनाला व बेगनाला यांना येणाऱ्या महापुरामुळे जिवितहानी होण्याची शक्यता असल्याबाबत

**(७) ४२९३८ (२२-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) शहरातील दलित वस्तीमधून लेंडीनाला व बेगनाला यांना येणाऱ्या महापुरामुळे वस्तीला मोठा धोका निर्माण होऊन जिवितहानी होण्याची शक्यता असल्याने सदरील नाल्याचे खोलीकरण आणि संरक्षण भिंत बांधकामासाठी रु.२.०० कोटी निधी प्रधान्याने उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिल्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री यांना निवेदन देऊनही अद्यापपर्यंत निधीची पूर्तता करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी निधीची पूर्तता करण्यासाठी काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१७) :**(१) व (२) निधी मागणीबाबतचे निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे. सन २०१५-२०१६ करिता अमरावती जिल्ह्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेमधून रु.९ कोटी वितरित करण्यात आले आहेत. याशिवाय सदर योजनेतून रु. १२ कोटी सन २०१६-१७ करिता वितरित करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी शहरी विभागात घरे बांधण्याबाबत**

**(८) ५८८६३ (२९-०८-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी शहरी भागात घरे या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी बृहन्मुंबई, ठाणे, कल्याण इत्यादी १९ शहरांच्या हद्दीमधील सर्व भागांचे सर्व्हेक्षण करण्याची जाहिरात मुंबईतील दिनांक २२ मे, २०१६ च्या लोकसत्ता वर्तमानपत्रातून शासनाने प्रसिध्द केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर योजनेच्या माध्यमातून प्रत्यक्ष घरांची मागणी नोंदवून त्यानूसार सर्वांसाठी घरे या योजनेसाठीचा कृती आराखडा शासनाने सादर करावयाचा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदनिका घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांकडून म्हाडाच्या https://maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १२ मे, २०१६ ते १३ जून, २०१६ या कालावधीत अर्ज उपलब्ध करुन देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेत सहभागी होण्यासाठी शासनाने कोणत्या अटी व शर्ती ठेवल्या आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१५-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

सर्वांसाठी घरे २०२२ या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार रज्ज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने दि. ९ डिसेंबर, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार सदर योजना ४ घटकात राबविण्यात येणार आहे. घटक क्र. १, ३ व ४ या अंतर्गत म्हाडा व २ या अंतर्गत प्राप्त होणाऱ्या राज्यस्तरीय बॅंकर्स समिती सुकाणु अभिकरण काम करणार आहे.

या अनुषंगाने मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रातील सर्व गावात सर्वेक्षणात सहभाग होण्याकरिता विविध वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्याचबरोबर गावोगावी जनतेमध्ये या योजनेबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने विविध उपाययोजना उदा. गाड्यावर जाहिरात फलक लावून प्रचार करणे, गाड्यामध्ये प्रशिक्षीत कर्मचारी नेमून प्रत्यक्ष जागेवर अर्ज भरुन घेण्यात आले आहेत.

(२) प्रकल्प मंजूरीची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

अ) शहरांच्या कृती आराखड्यस अनुरुप प्रकल्प अहवाल नागरी स्वराज्य संस्थाकडून सुकाणू अभिकरण सादर करण्यात येणार आहे.

ब) प्रकल्प मूल्यमापनासाठी सुकाणू अभिकरणाकडून राज्यस्तरीय मुल्यमापन समितीकडे (SLAC) प्रकल्प सादर करणे.

क) राज्यस्तरीय मुल्यमापन समितीकडून प्रकल्प अहवाल राज्यअभियान संचालनालयाकडे सादर करेल.

ड) राज्य अभियान संचालनालयाकडून प्रकल्प अहवाल मंजूरीसाठी राज्यस्तरीय मंजूरी व संनियंत्रण समितीकडे सादर करेल.

(३) हे खरे आहे.

ऑनलाईन सर्व्हेक्षण अर्ज स्वीकृत करण्यात आले आहेत.

(४) सदर योजनेत सहभागी होण्यासाठी शासनाने अत्यल्प उत्पन्न गटासाठी खालील अटी व शर्ती नमूद केल्या आहेत.

१) वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु.३ (तीन) लाखांपैक्षा कमी असावे.

२) भारतात कुठेही स्वमालकीचे पक्के घर नसावे.

३) मुंबई महानगरप्रदेशातील (MMR) निवासी लाभधारकास या सर्व्हेक्षणात सहभागी होता येईल.

४) अत्यल्प उत्पन्न गटासाठी (EWS) राज्य शासन रु.१ लक्ष व केंद्र शासन रु.१.५० लक्ष अनुदान अनुज्ञेय असून सदनिकेचे चटई क्षेत्र ३० चौ.मी. पर्यंत असेल.

---

**नांदेड शहरातील श्रीवस्तीनगर येथे महानगरपालिकेने**
**बीएसयुपी योजनेंतर्गत बांधलेल्या घरांबाबत**

**(९) ५९३५८ (२९-०८-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील श्रीवस्तीनगर येथे महानगरपालिकेने बीएसयुपी योजनेंतर्गत बांधलेली ३५० घरे गेल्या दोन ते तीन वर्षापासून विनावापर पडून असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या इमारती विनावापर पडून असल्याने सदनिकांमधील साहित्यांची नासधुस होऊन शासनाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या इमारतीमधील सदनिकांचे वाटप लाभार्थींना अद्यापपर्यंत न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश महेता (१८-०७-२०१७) :** (१) केंद्र शासन पुरस्कृत बीएसयुपी योजनेअंतर्गत नांदेड महानगरपालिकेअंतर्गत श्रीवस्तीनगर येथे एकूण ८७७ घरकुलांचे बांधकाम करण्यात आले असून त्यापैकी ४८० घरकुलांचे वाटप लाभार्थ्यांना करण्यात आले आहे. उर्वरित ३९७ घरकुलांचे वाटप करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

नांदेड शहरातील श्रीवस्तीनगर साईट क्र. ३४ मधील ८७७ घरकुलांचे बांधकाम शहरातील विकास बांधकाम कामात बाधीत होऊन बेघर होणाऱ्या मालमत्ताधारकांना वाटप करण्यासाठी बांधण्यात आली आहेत. सद्य:स्थितीत ४८० बाधीत मालमत्ताधारकांना घरकुलांचे वाटप करण्यात आले असून मालमत्ताधारक निश्चित झाल्यानंतर शिल्लक ३९७ घरकुले विकास बांधकाम बाधीत झालेल्या मालमत्ताधारकांना घरकुलांचे वाटप करण्याचे प्रयोजन करण्यात आले आहे.

---

## राज्यातील जादूटाणा प्रतिबंधक कायद्यानुसार सोनसाखळी काढून देणाऱ्या स्वयंघोषित बाबाविरुध्द गुन्हा नोंद करणेबाबत

**(१०) ६४२०२ (२३-०८-२०१६). अ‍ॅड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जादूटोणा प्रतिबंधक कायद्यानुसार मुख्यमंत्र्यांच्या पत्नी यांना दिनांक ९ फेब्रुवारी, २०१६ रोजी हवेतून सोनसाखळी काढून देणाऱ्या स्वयंघोषित बाबाविरुध्द गुन्हा नोंदवून कारवाई करण्याची मागणी विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, जागरुक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते यांनी मा.मुख्यमंत्री, राज्यमंत्री (गृह), पोलीस आयुक्त (नागपूर/मुंबई) यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई पोलीस आयुक्तालयास हेलिकॉप्टर उपलब्ध करुन देणेबाबत.

**(११) ६५१७५ (१७-०१-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत आंतरराष्ट्रीय प्रकल्प उभरण्यात येणार असून जेएनपीटी बंदर, ओएनजीसी इत्यादी ठिकाणी अनुचित प्रकार घडल्यास स्थानिक पोलीस व सुरक्षा यंत्रणांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार हे विचारात घेता सुरक्षा तसेच अन्य कारणाकरिता हेलिकॉप्टरची आवश्यकता असल्याची गरज फोर्स वनच्या कर्मचाऱ्यांनी दिनांक १४ ऑक्टोबर वा त्या दरम्यान व्यक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयास हेलिकॉप्टर उपलब्ध करून द्यावे याकरिता मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयास हेलिकॉप्टर उपलब्ध करून देण्याबाबत शासन स्तरावरून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१७) :** (१) आपत्कालीन परिस्थितीमध्ये फोर्स-१ दलासाठी हवाईमार्गाने प्रवास करण्याकरिता भाडेतत्वावर हेलिकॉप्टर घेण्याची प्रक्रिया पोलीस महासंचालक स्तरावर सुरू आहे. तथापि, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकरिता हेलिकॉप्टरची आवश्यकता नसल्याचे त्यांनी शासनास कळविले आहे.

(२) सदर विषयाबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री कार्यालयास प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विक्रोळी ते कोपरखैरणे असा उड्डाणपूल बांधण्याबाबत

**(१२) ६५५७४ (१६-०१-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी ते कोपरखैरणे असा उड्डाणपूल बांधण्यासाठी नियुक्त केलेल्या सल्लागारांकडून सुसाध्यता अहवाल प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवालाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यानुसार सदर पुलाच्या बांधकामास कधी सुरुवात करण्यात येणार आहे व किती कालावधीत काम पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७) :** (१) नाही.

(२) व (३) मे. एन. पी. ब्रिजींग या सल्लागाराकडून अंतिम सुसाध्यता अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर पुलाकरीता पर्यावरणविषयक/सीआरझेड विषयक परवानग्या घेणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे सदर पुलाच्या मुंबई व नवी मुंबई बाजूकडील विकिरण व्यवस्थेकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्यास बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई वाहतूक पोलीस, नवी मुंबई महानगरपालिका, सिडको, नवी मुंबई वाहतूक पोलीस, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ इत्यादींची सहमती प्राप्त झाल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची प्रशासकीय मान्यता घेऊन सदर पुलाकरीता निविदा प्रक्रिया हाती घेणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.

---

### ठाणे महापालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरीकांचे पुनर्वसन करणेबाबत

**(१३) ६६३१५ (१६-०१-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींमध्ये राहणा-या शेकडो नागरीकांचे पुनर्वसन करणे तसेच दाटीवाटीच्या क्षेत्रातील इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी तीन आणि उर्वरित भागासाठी दोन एफएसआय देण्याबाबत महापालिकेने शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी सादर केलेल्या प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच महापालिका क्षेत्रामध्ये मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये वास्तव्यास असलेल्या नागरीकांच्या सुरक्षेसाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१७) :** (१) व (२) ठाणे महानगरपालिकेने ठाणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील अधिकृत इमारतीच्या पुनर्बांधणीकरिता ॲपेंडीक्स-आर मध्ये असलेली तरतूद ३० वर्ष पुर्ण झालेल्या इमारतीकरिता लागू करण्यानुषंगाने व ॲपेंडीक्स-आर मधील तरतूदीनूसार उत्तेजनार्थ भूनिर्देशांक भाडेकरु व्याप्त इमारतीसह, मालक व्याप्त तसेच गृहनिर्माण संस्थांच्या सभासदांनी व्याप्त इमारतींना लागू करण्यानुषंगाने विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करण्याचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ चे दोन स्वतंत्र प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता सादर केला आहे. सदर प्रस्तावावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडगांव नगरपरिषदेस (जि.कोल्हापूर) विशेष रस्ता अनुदान देण्याबाबत**

**(१४) ६६६९८ (१६-०१-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगांव नगरपरिषद (जि.कोल्हापूर) हददीमध्ये युआयडीएसएसएमटी योजनेअंतर्गत संपूर्ण शहरामध्ये नळपाणी पुरवठा योजनेचे काम करतांना रस्ते खणण्यात आल्याने संपूर्ण रस्ते खराब झाले असून नगरपरिषदेस विशेष रस्ता अनुदान देण्याची मागणीसाठी वडगांव नगरपरिषद, वडगांव यांनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना माहे सप्टेंबर, २०१६ च्या सुमारास एक लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने वडगांव नगरपरिषदेस विशेष रस्ता अनुदान देण्यासंदर्भात निर्णय घेऊन निधी उपलब्ध करुन दिला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) होय हे खरे आहे.
(२) शासनास प्राप्त विविध निवेदनांच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ अन्वये विशेष रस्ता अनुदान रु.१.८० कोटी वडगांव नगरपरिषदेस वितरीत करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे गोरखपूर ज्ञानगंगा एक्सप्रेसमधील प्रवाशांना शस्त्राचा धाक दाखवून दरोडेखोरांनी लुट केल्याबाबत**

**(१५) ६७२३७ (१७-०१-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे गोरखपूर ज्ञानगंगा एक्सप्रेसच्या सर्वसाधारण डब्यातील प्रवाशांना शस्त्राचा धाक दाखवून दरोडेखोरांनी ४६ हजारांची रोकड व १० मोबाईल लुटल्याची घटना दिनांक १४ ऑक्टोंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी मनमाड लोहमार्ग पोलीसांत दाखल करण्यात आलेला गुन्हा अहमदनगर लोहमार्ग पोलीसांकडे वर्ग करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच भविष्यात असे प्रकार घडू नयेत म्हणून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
पुणे गोरखपूर एक्सप्रेसच्या सर्वसाधारण डब्यातील प्रवाशांना चाकूचा धाक दाखवून ६ मोबाईल व रोख रक्कम असा एकूण रु. ४५,३००/- रकमेचा मुद्देमाल चोरुन नेला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
सदर प्रकरणी प्रथम मनमाड पोलीस ठाणे येथे ००/२०१६ भा.दं.वि. कलम ३९५, ३४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हा अहमदनगर लोहमार्ग पोलीस ठाणेकडे गु.र.नं. ४८/२०१६ भा.दं.वि. कलम ३९५, ३४२ अन्वये वर्ग करण्यात आला आहे.
(३) सदर प्रकरणी ५ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून ५ मोबाईल व रोख असा एकूण १९,८००/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून मा. न्यायालयात दोषरोपपत्र सादर करण्यात आले आहे.
अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून आर.पी.एफ. मार्फत धावत्या गाड्यांवर पेट्रोलिंग करण्यात येत आहे. रेल्वे स्टेशनवर गणवेशातील पोलीसांची पेट्रोलिंग नेमण्यात आलेली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागात मनुष्यबळाचा अभाव असल्याबाबत**

**(१६) ६७५८२ (१६-१२-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ निर्मिती करणाऱ्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागातच मनुष्यबळाचा अभाव असून कर्मचाऱ्यांची तब्बल ४ हजार १६० पदे रिक्त असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागाला पूर्ण वेळ संचालकही उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग १ व २ प्रकरणी शासनाने आढावा घेवून येथील रिक्त पदे भरण्याबाबत व या विभागाला पुर्णवेळ संचालक उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०६-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण हे पद सरळसेवेने महाराष्ट्र लोकसेवा अयोगामार्फत भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत गट अ, ब, क व ड संवर्गात १४६३५ इतकी पदे मंजूर आहेत, त्यापैकी ४२७१ पदे रिक्त आहेत. यामध्ये गट अ व ब संवर्गातील अधिकारी स्तरावरील मंजूर ९०१ पदांपैकी ३८० पदे रिक्त आहेत. तथापि, सदरहु रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिका-यांकडे सोपवून कामकाज सुरळीतपणे सुरु आहे.

गट अ व ब संवर्गातील अधिका-यांची रिक्त असलेली पदे तसेच गट क संवर्गातील रिक्त असलेली पदे ही सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. गट-क संवर्गातील रिक्त असलेल्या शिक्षकीय पदांवर तासिका तत्वावर शिक्षकांची नेमणूक करुन प्रशिक्षण सुरु आहे. गट - ड संवर्गातील पदे वित्त विभागाच्या धोरणानुसार मंजूर पदांपैकी २५ टक्के पदे निरसीत करावयाची असून, पदांच्या आढाव्यांतर्गत समायोजनाची कार्यवाही करण्यांसाठी गट-ड संवर्गातील पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यांत येत नाही. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदांच्या आढाव्याची कार्यवाही सुरु असून, आढाव्याअंती पुढील आवश्यक कार्यवाही करण्यांत येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___

### तिरोडा येथील पोलीस स्टेशन इमारत व कर्मचारी निवासस्थानाच्या बांधकामाबाबत

**(१७) ६९६७५ (१७-०१-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा (जि.गोंदिया) पोलीस स्टेशन इमारत व कर्मचारी निवास्थानांचे बांधकाम सन १८९१ मध्ये करण्यात आले असून सदर इमारती अत्यंत जीर्ण झाल्या असल्यामुळे पावसाळ्यापूर्वी पोलीस स्टेशन इमारत व कर्मचारी निवासस्थानांची डागडुजी करुन ताडपत्री टाकावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस स्टेशन नक्षलग्रस्त भागात असून पावसाळ्यात इमारत कोसळण्याचा धोका असुन जीवित व वित्तहानी होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलीस स्टेशन व कर्मचारी निवासस्थानांसाठी नवीन इमारत बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ व दिनांक २४ मे, २०१६ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१७) :**(१), (२), (३) व (४) होय. सदर पोलीस स्टेशन इमारत व कर्मचारी निवासस्थानाबाबत क्षत्रीय कार्यालयाकडून सार्वजनिक बांधकाम विभाग, यांना अंदाजपत्रके व नकाशे सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कुडाळ नगरपंचायतीला (जि.सिंधुदुर्ग) आवश्यक असलेला निधी मंजूर करणेबाबत

**(१८) ७०१०५ (१६-०१-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ नगरपंचायत (जि.सिंधुदुर्ग) घनकचरा व्यवस्थापन व विज निर्मीती प्रक्रिया प्रकल्प व शहरातील खडडे बुजविण्यासाठी निधी उपलब्ध नसल्याचे मुख्याधिकारी यांनी नगरपंचायतीच्या सदस्यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपंचायतीने शासनाकडे उक्त कामांसाठी निधी मिळावा यासाठी प्रस्ताव दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रस्तावावर कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

कुडाळ नगरपंचायतीकडे १४ वा वित्त आयोगातील मुलभुत अनुदानातून दोन टप्प्यात एकूण १,२७,०२,२८६/- रुपये निधी प्राप्त आहे. यापैकी ५०% निधीतून शासन निर्णयानुसार

घनकचरा व्यवस्थापन, वाहतुक व प्रक्रिया यावरील खर्च अनुज्ञेय आहे. या वरील उपलब्ध निधीबाबत सर्वसाधारण सभेमध्ये सदस्यांना कळविले आहे.

शहरातील रस्त्यांच्या कामाकरिता सर्वसाधारण रस्ता अनुदानातून २० लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. याबाबत सर्वसाधारण सभेमध्ये सदस्यांना कळविले आहे. तसेच जिल्हास्तर नगरोत्थान योजनेतून रस्त्यांची कामे करण्यासाठी २,३१,१४,४२४/- रुपयांचा निधी मिळण्याकरिता मा.जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे १४ वा वित्त आयोग अंतर्गत उपलब्ध निधीची माहिती सर्वसाधारण सभेत दिल्याचे मुख्याधिकारी, कुडाळ नगरपंचायत यांनी शासनास कळविले आहे.

(२) व (३) शासनास प्राप्त प्रस्ताव/निवेदने यांच्या अनुषंगाने सन २०१६-१७ करिता कुडाळ नगरपंचायतीस नवीन नगरपंचायत योजने मध्ये रु.२५ लक्ष व रस्ता अनुदान रु.२० लक्ष वितरीत केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे रांजनोली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे मे. इकोहोम टाऊनशिप (टाटा आमंत्रा) या टॉवरबाबत**

**(१९) ७०७५९ (१६-१२-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रांजनोली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे मे. इकोहोम टाऊनशिप (टाटा आमंत्रा) या नावाने टॉवर उभे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या बांधकामापूर्वी बांधकाम परवानगी घेणे अपेक्षित असतांना सदर परवानगी घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१७) :** (१) मौजे रांजनोली, ता.भिवंडी, जि.ठाणे येथे मे.टाटा हौसिंग डेव्हलपमेंट कंपनी लिमी. यांचे टाटा आमंत्रा या नावाने भाडे तत्वावरील घरे योजना गृहप्रकल्पाचे काम सरु आहे.

(२) उक्त गृहप्रकल्पास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ४५ मधील तरतुदीनुसार विकास परवानगी दिली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महापालिकेत (जि.ठाणे) समावेश करण्यात आलेल्या २७ गावांबाबत**

**(२०) ७१३१० (१६-०१-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिकेत (जि.ठाणे) २७ गावांचा समावेश झाल्यावर शासनाने सदरहु गावातील रस्त्यांचे विकासासाठी जाहिर केलेले २३ कोटी रूपयांचे अनुदान महापालिकेस अद्यापही देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुदान प्राप्त न झाल्यामुळे ग्रामीण भागातील सर्व रस्त्यांची दुरूस्तीची कामे रखडली आहे व मानपाडा, मलंगगड, उसरघर, कोळे घेसर इ. रस्ते अत्यंत खराब झाल्यामुळे रिक्षावाले या भागात प्रवासी घेऊन जात नसल्याने जनतेला खूप त्रास सहन करावा लागत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अनुदानाची २३ कोटी रूपये रक्कम महापालिकेस देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१), (२) व (३) महानगरपालिका क्षेत्रात नव्याने समाविष्ट झालेल्या क्षेत्रातील मुलभुत सुविधांच्या विकासा करीता शासनाकडून अनुदान दिले जाते. सदर योजनेचे निकष शासन निर्णय दि.२० जून, २०१२ अन्वये निश्चित करण्यात आले आहेत. या नुसार कल्याण डोंबिवली मनपाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर शहरात फटाक्यांची अवैध वाहतुक होत असल्याबाबत**

**(२१) ७१८४५ (११-०१-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर शहरात फटाक्यांची अवैध वाहतुक होत असल्याबाबत शहरातील पत्रकारांनी पोलीस महामंड - ४ मधील उपायुक्त श्री. सुनील भारद्वाज व महापालिकेच्या अग्निशमन अधिकाऱ्यांना दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ रोजी निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०७-२०१७) :** (१) ट्रकमधून फटाके वाहतूकीबाबत दि. २०/१०/२०१६ रोजी दूरध्वनीवरुन पोलीसांना माहिती मिळाली.
(२) सदर ट्रकचालक याचेविरुध्द पो.नॉ.कॉ. रजि. नं. २०२/२०१६ म.पो. का. ३३(६) १३१ प्रमाणे मध्यवर्ती पोलीस ठाणे, उल्हासनगर मार्फत कारवाई करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दौंड नगरपरिषदेच्या (जि.पुणे) हद्दीत असलेल्या भुयारी मार्गासाठी १० कोटींच्या निधीची मागणी करणेबाबत**

**(२२) ७३१३६ (१६-०१-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड नगरपरिषदेच्या (जि. पुणे) हद्दीत असलेल्या भूयारी मार्गासाठी अतिरिक्त १० कोटींच्या निधीची मागणी करणेबाबत लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१५ व माहे मार्च, २०१६ मध्ये मुख्यमंत्री व पालकमंत्री, पुणे यांच्या सोबत पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीची मागणी नगरपालिकेने शासनाच्या नगरविकास विभागाकडे देखील केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रस्तुत प्रकरणी सविस्तर प्रस्ताव मागविण्यात आला असून, त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**दिघा (नवी मुंबई) परिसरातील बांधकांमाना संरक्षण मिळणेबाबत**

**(२३) ७३९४८ (२०-०४-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिघा (नवी मुंबई) परिसरातील ९९ इमारतींवर कारवाई करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिल्यानंतर सर्वसामान्य रहिवाश्यांवर बेघर होण्याची आपत्ती ओढवली असतांना त्या भागातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिघा वासियांना संरक्षण मिळावे म्हणून मा. मुख्यमंत्री महोदयांना माहे डिसेंबर, २०१६ मध्ये लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकामाना संरक्षण देण्याबाबतचे धोरण शासन लवकरच मा. उच्च न्यायालयात मांडणार असून त्याचा फायदा दिघा वासियांना मिळणार असल्याची भूमिका शासनाच्यावतीने सभागृहात मांडण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दोनवेळा मा. उच्च न्यायालयात सादर केलेले धोरण मा. उच्च न्यायालयाने फेटाळल्याने दिघा येथील रहिवासी बेघर होणार असल्याने त्यांना संरक्षण मिळावे म्हणून शासनाच्यावतीने तातडीने नवीन धोरण मा.उच्च न्यायालयात सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दिघा येथील अनधिकृत बांधकामाबाबत जनहित याचिका क्र.८०/२०१३ व जनहित याचिका क्र.१३८/२०१२ मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या आहेत. या याचिका प्रामुख्याने दिघा येथील सिडको, एमआयडीसी यांच्या जागेवरील अनधिकृत बांधकामे निर्मुलन करण्यासंबंधी दाखल झालेल्या आहेत. या याचिकांमध्ये शासनातर्फे अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचे धोरण मा.उच्च न्यायालयात मान्यतेसाठी सादर केले असता, मा. उच्च न्यायालयाने दि. २८, २९, ३० जुलै, २०१५ रोजीच्या आदेशान्वये सदर धोरणाच्या अंमलबजावणीस अनुमती दिलेली नाही. तथापि, सुधारीत धोरण तयार करण्यास अनुमती दिलेली होती. मा. उच्च न्यायालयाचे निर्देश विचारात घेऊन राज्य शासनाने प्रारुप सुधारित धोरण तयार करुन त्यास दि. २८ जुलै, २०१६ रोजी मा. मंत्रीमंडळाची मान्यता प्राप्त केली. मा. मंत्रीमंडळाने मान्य केलेले धोरण अंमलबजावणी करण्यासाठी मा. उच्च न्यायालयात दि.२९/०७/२०१६ रोजी प्रतिज्ञापत्राद्वारे दाखल करुन त्यास मा. उच्च न्यायालयाची अनुमती अपेक्षिली होती. परंतू मा. उच्च न्यायालयाने राज्य शासनाचे अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचे धोरण दिनांक २३ व २४ मार्च, २०१७ च्या आदेशान्वये फेटाळले आहे. त्यानंतर शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ व ५३ मध्ये सुधारणा करुन त्यानुसार विधेयक महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषदेच्या सभागृहात मान्यतेसाठी सादर केले. विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी त्यास मान्यता दिलेली असून, त्यानुसार दिनांक १५/४/२०१७ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात विधेयक प्रसिध्द झाले आहे. त्या अनुषंगाने अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबतची नियमावली तयार करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील शेतकऱ्यांचे किमान वेतन व इतर मागण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा आयोजीत केल्याबाबत**

**(२४) ७४०८३ (१४-०४-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांना किमान वेतन मिळावे तसेच इतर प्रलंबित मागण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यादरम्यान केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांच्या मागण्या कोणत्या आहेत,

(३) असल्यास, आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२४-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) आंदोलनकर्त्या शेतक-यांच्या मागण्या खालीलप्रमाणे आहेत.
१. शेतमजूरांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन मिळावे.
२. महात्मा गांधी रोजगार हमी योजनांची कामे शेतमजूरांना मिळावीत.
३. बेघरांना घरकुल योजनेनुसार घरे व घरासाठी जागा मिळावी.
४. ६० वर्षे वयातील सर्व शेतमजूरांना पेन्शन योजना चालू करावी.
५. शेतमजूरांना आरोग्य सवलती उपलब्ध करुन द्याव्यात.
६. शेतमजूरांच्या पाल्यांना शैक्षनिक सुविधा मोफत व शैक्षणिक साहीत्य उपलब्ध करुन द्यावे.
७. शेतमजूर महिलांना बाळंतपणाच्यावेळी आर्थिक सहाय्य मिळावे.
(३) किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत “शेतकी कामधंदा” या अनुसूचित रोजगारातील कामगारांचे किमान वेतन दि.८ ऑगष्ट २०१४ रोजी पुर्न:निर्धारीत केले आहे. तसेच असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम-२००८ अन्वये राज्यातील “असंघटीत कामगारांसाठी असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ” गठीत करण्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून या मंडळाचे गठण झाल्यानंतर मंडळाद्वारे राज्यातील असंघटीत कामगारांसाठी (ज्यामध्ये शेतमजुरांचा देखील समावेश होतो) विविध सामाजिक सुरक्षा योजना राबविणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) परिवहन समितीने कल्याण मुरबाड मार्गावर बस सेवा सुरु करण्याबाबत**

**(२५) ७४५८० (२०-०४-२०१७). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) परिवहन समितीने दोन वर्षांपूर्वी ठराव मंजूर करूनही कल्याण मुरबाड मार्गावर बस सेवा चालू करण्यात आलेली नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्ताव मंजूर होऊन दोन वर्ष झाली तरी ठराविक प्राधिकरणाची मार्गावर बस चालवण्यासाठी परवानगी घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, के.डी.एम.टी. ची मुरबाड मार्गावर कल्याण-मामणोली ही बस सुरु होती परंतु अपुऱ्या बसमुळे ही सेवा बंद करावी लागली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन समितीने दि.१९/११/२०१३ रोजी सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी दिली असून यामध्ये कल्याण-मामणोली-मुरबाड या मार्गाचा देखील समावेश आहे.

(२) प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, मुंबई महानगर क्षेत्र, मुंबई यांच्या दि.०७/०२/२००९ च्या बैठकीत मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील सर्व महानगरपालिका परिवहन उपक्रमांना स्वतःच्या व एकमेकांच्या हद्दीत प्रवासी सेवा देण्यास मंजूरी दिली आहे.

(३) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने कल्याण ग्रामीण भागातील तोट्यात चालणाऱ्या १८ मार्गावरील बस सेवा सुरु करण्याबाबत दि.२३/०९/२००८ रोजी निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने सदर बस सेवा, दि.१३/०६/२००८ च्या ठरावान्वये दि.०६/०८/२००९ पासून बंद करण्यात आल्या असून, त्यामध्ये कल्याण-मामणोली या मार्गावरील बस सेवेचा समावेश आहे.

(४) सद्यस्थितीत कल्याण-मामणोली या मार्गावर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची प्रवासी वाहतूक सेवा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) येथील गोविंदवाडी बायपास रस्त्याबाबत**

**(२६) ७४५८३ (२०-०४-२०१७). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील गोविंदवाडी बायपास मार्गी लावल्याचा दावा महानगरपालिका प्रशासनाकडून केला जात असून जागा मालकाने महानगरपालिका प्रशासनावर फसवणुकीचा आरोप केल्या आहे तसेच तबेल्याच्या बदल्यात महानगरपालिका प्रशासनाने करारान्वये मालकाला दिलेला भूखंड अद्याप महानगरपालिकेच्या ताब्यातच असल्याचे स्पष्टीकरण महानगरपालिकेचे नगररचनाकार रवी राव यांनी दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवाजी चौक ते महात्मा फुले चौक रस्ता रुंदीकरण, गोविंदवाडी बायपास यासारख्या महत्वाच्या रस्त्यांसोबत शहरातील इतर रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे काम युद्धपातळीवर करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले होते. मात्र बाधितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर त्यांचे पुनर्वसन करू असे तोंडी आश्वासन देत अनेक नागरिकांना बेघर करण्यात आले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, तब्बल ७ वर्षे प्रलंबित असलेल्या गोविंदवाडी बायपास रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने तबेला मालकाला करारान्वये दिलेला भूखंड महानगरपालिकेच्या अद्याप ताब्यातच नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

जागा मालक यांनी दुर्गाडी किल्ला ते पत्रीपूल रस्त्याकरीता महानगरपालिकेस हस्तांतरीत करीत असलेल्या जागेच्या किंमती इतकीच मौजे-कल्याण येथील महानगरपालिकेच्या ताब्यात असलेली जागा देण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून प्रस्तावित आहे.

(२) हे खरे नाही.

महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील शिवाजी चौक ते महात्मा फुले चौक या रस्त्याचे रुंदीकरणामध्ये बाधित काही दुकानदार यांना महानगरपालिकेच्या ताब्यातील "भाजी बाजार" करीता आरक्षित असलेल्या इमारतीमध्ये पुनर्प्रस्थापित करण्यात आले आहे. तसेच उर्वरित बाधितांना उपलब्धतेनुसार पुनर्प्रस्थापित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून सुरु आहे.

(३), (४) व (५) श्री.अस्लम गुलाम मोहम्मद कर्ते यांना रस्त्याने बाधीत जागेचा मोबदला म्हणून महानगरपालिकेच्या ताब्यातील मौजे-कल्याण, स.नं.२६, हि.नं.१(पै), आरक्षण क्र.१ "दुभती जनावरांचा तबेला" या आरक्षणापैकी हस्तांतरणीय विकास हक्कादवारे जागा देण्याबाबत दि.०२/०१/२०१६ रोजी जागा मालक श्री.कर्ते व इतर आणि महानगरपालिका यांच्यामध्ये समझोता करारनामा करण्यात आला आहे.

जागामालक श्री.कर्ते यांना रहिवास झोनमध्ये बदल करुन द्यावयाच्या जागेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ नुसार कार्यवाही करण्याकरीता महानगरपालिकेने पारित केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने, जाहिर सूचना प्रसिद्ध करुन हरकती/सूचना मागविण्यात आल्या असून त्यानुसार महानगरपालिकेकडून पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

---

**राज्यातील मोठ्या शहरांमध्ये ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याकरिता त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात येणार असल्याबाबत**

**(२७) ७५०५१ (२०-०४-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मोठमोठ्या शहरांमध्ये ध्वनी प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनला असल्यामुळे त्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ध्वनी प्रदूषणावर आळा बसविण्यासाठी १८५३ ध्वनिमापक उपकरणे खरेदी करावीत असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने शासनाला दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची समिती कधीपर्यंत अस्तित्वात येणार आहे व समितीचे नेमके स्वरूप कसे असणार आहे,

(४) असल्यास, ध्वनी प्रदूषणावर आळा बसविण्यासाठी अत्याधुनिक ध्वनिमापक उपकरणे कधीपर्यंत उपलब्ध होणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही. तथापि मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांप्रमाणे ध्वनीप्रदूषण नियंत्रणाबाबतची कार्यवाही अधिक प्रभावीपणे होण्यासाठी संनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी संनियत्रण समितीची स्थापना दिनांक २८.०२.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये करण्यात आली असून संनियत्रण समितीची (Monitoring Committee) संरचना खालीलप्रमाणे आहे:-
अ) मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई व नागपूर आयुक्तालयाकरिता :-
१. सह पोलीस आयुक्त - अध्यक्ष
(मुंबई पोलीस आयुक्तालयाकरिता सह पो.आयुक्त (का.व.सु.)
२. पोलीस उपायुक्त - सदस्य
(प्रत्येक परिमंडळनिहाय)
३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ - सदस्य
ब) अमरावती, सोलापूर, नाशिक, औरंगाबाद, लोहमार्ग मुंबई आयुक्तालयाकरिता :-
१. पोलीस आयुक्त - अध्यक्ष
२. पोलीस उपायुक्त - सदस्य
(प्रत्येक परिमंडळनिहाय)
३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ - सदस्य
क) सर्व जिल्हयांकरिता :-
१. अपर पोलीस अधिक्षक - अध्यक्ष
२. पोलीस उप अधिक्षक (गृह) - सदस्य
३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ - सदस्य
(४) १८५३ ध्वनीमापक उपकरणे डिसेंबर, २०१७ अखेर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगर क्षेत्रातील 'ड' वर्ग पनवेल महानगरपालिकेचा बाहय रस्ते विकास योजनेमध्ये समावेश करण्याबाबत**

**(२८) ७५४२६ (२०-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर क्षेत्रातील 'ड' वर्ग पनवेल महानगरपालिकेचा बाह्य रस्ते विकास योजनेमध्ये समावेश करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवदेनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाह्य रस्ते विकास योजनेच्या धोरणानुसार महानगरपालिका क्षेत्र योजनेमधून वगळण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्यस्थितीत महानगरपालिकेची आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे महानगरपालिका हद्दीत मुलभुत सुविधा पुरवणे अडचणीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई महानगर क्षेत्रातील पनवेल 'ड' वर्ग महानगरपालिकेचा समावेश केल्यास बाह्य रस्ते विकास योजनेतूनही विकास कामे प्रस्तावित करणे शक्य होतील, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पनवेल महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता बाह्य रस्ते विकास योजनेमध्ये समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१७) :** (१) व (२) होय.
(३), (४), (५) व (६) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बाहय रस्ते विकास योजनेमध्ये महानगरपालिका क्षेत्राबाहेरील कामे घेण्याचे प्राधिकरणाचे धोरण असल्याने त्यानुसार बाह्य रस्ते विकास योजनेत जिल्हा परिषद व नगरपालिकेच्या हद्दीतील रस्ते, पूल इत्यादी कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेतली जातात. पनवेल महानगरपालिका अंतर्गत रस्त्याची कामे बाहय रस्ते विकास योजनेत घेणे सद्यस्थितीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धोरणानुसार शक्य नाही.

---

## सिडकोने विकसित केलेल्या खांदा कॉलनी तसेच नवीन पनवेल हद्दीतील खड्डयांमुळे वाहतुकीस मोठया प्रमाणात अडथळे निर्माण होत असल्याबाबत

**(२९) ७५४३१ (२०-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडकोने विकसित केलेल्या खांदा कॉलनी व नवीन पनवेल हद्दीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी रिलायन्स जीओ तसेच महावितरणामार्फत केबल टाकण्यासाठी खोदण्यात आलेल्या रस्ते काम पूर्ण होवूनसुद्धा बुजविण्यात न आल्यामुळे वाहतुकीस मोठया प्रमाणात अडथळे निर्माण होवून संपूर्ण परिसर खड्डेमध्य झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे नवीन पनवेल व खांदा वसाहतीत अपघतांचे प्रमाणही वाढत असून सिडको प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रस्ते पूर्व स्थितीत होण्यासाठी तसेच संबंधित ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७) :** (१), (२) व (३) पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडकोने विकसित केलेल्या खांदा कॉलनी व नवीन पनवेल हद्दीत केबल टाकण्यासाठी तसेच सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्यासाठी खोदलेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी संबंधित कंपन्यांकडून सिडकोकडे जमा करण्यात आलेल्या पुन:प्रापण (Reinstatement Charges) रक्कमेमधून दुरुस्तीचे काम करण्याचे सिडकोचे धोरण आहे.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीच्या प्रस्तावास दि.१४.१२.२०१६ रोजी शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र (मर्या.) (सिडको) कडून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. या रस्ते दुरुस्तीकरिता सिडकोकडून ई-निविदा मागविण्यात आल्या असून न्यूनतम देकार असलेल्या कंत्राटदारास कामाचे स्विकृतीपत्र दि.५.४.२०१७ रोजी देण्यात आलेले आहे. त्यानुसार कार्यादेश देऊन रस्ता दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल महानगरपालिकेला शासनामार्फत विविध विकास कामांना निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(३०) ७५४३२ (२०-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नव्याने स्थापन झालेल्या पनवेल महानगरपालिकेला शासनामार्फत विविध विकास कामांना व इतर आवश्यक गोष्टींना निधी उपलब्ध करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवदेनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेत समाविष्ठ झालेल्या ग्रामपंचायतीमार्फत थकविण्यात आलेली पाणी पुरवठा व विद्युत बिलांचा तसेच गावठाण क्षेत्रात मुलभुत सोईसुविधा पुरवण्यासाठी आर्थिक ताण महानगरपालिकेवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिका हद्दीत नागरिकांना सोईसुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिकेला आर्थिक निधी देण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) पनवेल नगरपालिकेचे महानगरपालिके मध्ये रुपांतर होण्यापूर्वी विविध योजनेअंतर्गत निधी मंजूर करण्यात आलेला आहे. महानगरपालिकांसाठी लागू असलेल्या

योजनेअंतर्गत उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद व मागणीच्या अनुषंगाने निधी मंजूर करण्याची कार्यावाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील विमानतळाच्या परिसरातील झोपडपट्टीवासियांचे व खासगी इमारतीमध्ये राहणाऱ्यांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३१) ७५४६८ (२१-०४-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील झोपडपटटीवासियांच्या पुनर्वसनासंदर्भात अदयाप निर्णय न घेतल्याने कुर्ला येथील झोपडपटटीवासिंयानी १६ जानेवारीपासून बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई उपनगरातील सांताक्रुझ विमानतळाच्या आजूबाजूच्या परिसरातील झोपड्यांचे व जुन्या खासगी इमारतींचे सर्व्हेक्षण पूर्ण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विमानतळाच्या परिसरातील झोपडपट्टीवासियांचे व खासगी इमारतीमध्ये राहणा-यांच्या पुनर्वसनाबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) असल्यास, विमानतळ परिसरातील झोपडपटीवासीय व इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांचे त्याच जागी पुनर्वसन व्हावे याकरिता राजकीय पक्षाच्या वतीने जीव्हीकेच्या विरोधात मोर्चा काढण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, झोपडपट्टीवासियांचे व इमारतीत राहणाऱ्या रहिवाश्यांचे त्याच परिसरात पुनर्वसन व्हावे याकरिता शासनस्तरावरील कार्यवाहीचे स्वरुप काय आहे वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१७) :** (१) कुर्ला येथील संदेश नगर व क्रांती नगर बैलबाजार रहिवाशांच्या वतीने झोपडपट्टी चळवळ या संस्थेचे अध्यक्ष श्री. घनश्याम भापकर यांनी दिनांक ३.१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १३.१.२०१७ पासून बेमुदत उपोषण करणार असल्याचा इशारा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे कार्यालयास दिलेला आहे.
(२) ते (५) विमानतळ अधिसूचित क्षेत्रामधील झोपडयांचे सर्व्हेक्षणाबाबत कार्यवाही सुरु आहे. आसपासच्या परिसरातील जुन्या खासगी इमारतींच्या सर्व्हेक्षणाबाबत आदेश देणेत आलेले नाहीत. विमानतळ अधिसूचित क्षेत्रामधील झोपडपट्टीवासियांची त्याच ठिकाणी पुनर्वसन व्हावे अशी मागणी आहे.

शासनाने छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसूचित क्षेत्राच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अनुषंगाने विनियम अंतर्भूत करणेचा निर्णय घेतलेला आहे.

सदर प्रारुप विनियमावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१अेअे) अन्वये दिनांक ९.९.२०१४ रोजी नागरिकांच्या सूचना/हरकती मागविणेत आलेल्या आहेत. त्यामध्ये १) in-situ पुनर्वसन, २) अधिसूचित क्षेत्रामध्ये इतरत्र पुनर्वसन, ३) बृहन्मुंबई क्षेत्रामध्ये व मुंबई महानगर प्रदेशामध्ये इतरत्र पुनवर्सन अशा पर्यायानुसार विमानतळावरील जागेमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेबाबतची तरतूद प्रस्तावित आहे.

विमानतळ परिसरातील इमारतींच्या उंचीवरील निर्बंध, जागेच्या उपलब्धतेवरील मर्यादा याचा विचार करता शक्य अधिकाधिक झोपडपट्टी धारकांचे अधिसूचित क्षेत्रामध्ये पुनर्वसन करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

---

## मुंबईत महानगरपालिकांच्या मंडईचा पुनर्विकास करण्याबाबत

**(३२) ७६०१४ (२०-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत महानगरपालिकांच्या मंडईचा पुनर्विकास करण्याबाबत दिनांक १४ मार्च, २०१६ रोजी नवीन धोरण शासनाने प्रसिध्द केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खार, सांताक्रुझ, चेंबूर, विलेपार्ले व अन्य एक अशा ५ मंडयांचे प्रस्ताव जुन्या धोरणानुसार मंजुर करण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महापालिकेचे कोटयावधी रुपयाचे होणा-या नुकसानास जबाबदार असलेल्या व्यक्तींवर शासन काय कारवाई करणार आहे वा करित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१७) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने महापालिकेच्या मंडईच्या पुनर्विकासाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) नुसार विकास नियंत्रण नियमावलीमधील फेरबदल प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर केलेला होता. शासनाने दिनांक १४.३.२०१६ रोजीच्या कलम ३७(२) खालील अधिसूचनेनुसार सदर फेरबदल प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी सदर प्रस्ताव हे शासनाने यापूर्वी मंजूर केलेल्या दिनांक २७.०२.२००४ व दिनांक ५.०५.२००५ रोजीच्या धोरणानुसार कार्यवाहीमध्ये होते. त्याचप्रमाणे मा.मुंबई उच्च न्यायालयाकडील रिट याचिका क्र. १८५३/२०११ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १८.९.२०१४ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर प्रस्तावांना मंजूरी दिलेली आहे.

(३) व (४) शासनाकडून चौकशी करण्यात आलेली नाही व तशी बाब उद्भवत नाही.

---

### उल्हासनगर महापालिका शहरास एफ.एस.आय. वाढवून देण्याबाबत

**(३३) ७६३७१ (२०-०४-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, कल्याण- डोंबिवली, मीरा भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी आणि वसई - विरार या सहा महापालिकामध्ये एम.एम.आर.डी.ए.अंतर्गत एक समान विकास निमंत्रण नियमावली लागू करण्यास मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे ऑगस्ट, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरमान्य मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या सोबतच नवी मुंबई आणि सिडको नवनगर विकास प्राधिकरणाच्या अधिसूचित क्षेत्रात क्लस्टर पुनर्विकासासाठी ४ एफ.एस.आय. ची तरतूद करण्यास देखील मा. मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देशात लोकसंख्या घनतेच्या दृष्टीने पहिल्या क्रमांकावर असलेल्या व केवळ १३.५ वर्ग कि.मी. क्षेत्रात बंदिस्त असलेल्या उल्हासनगर महापालिका शहरास एफ.एस.आय. वाढवून देण्याबाबत एकसमान विकास नियंत्रण नियमवालीनूसार काय निर्णय घेण्यात आला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) होय.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी जुलै, २०१६ च्या दरम्यान सदर प्रस्तावास मंजुरी दिली आहे.

(२) होय.

(३) मुंबई महानगर प्रदेशातील बृहन्मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिकेतील सिडकोचे क्षेत्र वगळून इतर सर्व महानगरपालिकांसाठी सर्व समावेशक व एकात्मिक विकास नियंत्रण नियमावलीची सूचना दि.२८/२/२०१७ रोजी प्रसिध्द केली आहे. सदर नियमावली उल्हासनगर शहराला लागू होणार आहे. सदर प्रसिध्द केलेल्या विकास नियंत्रण नियमवलीवर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांवर संबंधितांना सुनावणी देऊन शासनास अहवाल सादर करण्यासाठी सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. यामध्ये अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक देण्याची तरतूद प्रस्तावित केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कळंबोली (ता.पनवेल) मधील खांदा वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत

**(३४) ७६५१२ (२१-०४-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) मधील खांदा वसाहतीत सेक्टर ८ मधील ए टाईपची घरे मोडकळीस आली असून या ठिकाणी कित्येक घरांचे छत पडल्याच्या घटना घडल्या असून इमारतींना मोठ्या प्रमाणात तडे गेल्याने प्रभूकुंज सोसायटीत इमारत क्र.ए-११ मधील ३ क्रमांकाच्या खोलीमधील छताचा स्लॅब कोसळून दोघे जण जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडकोकडून पुनर्विकासाकरिता पुनर्बांधणी योजनेसाठी दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ रोजी मसुदा धोरण प्रसिध्द करुन त्यावर सूचना व हरकती मगाविण्यात आल्या होत्या. तसेच याबाबत परिणाम मूल्यमापन अहवालाच्या (Impact Assessment Report) आधारे सुरु करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,
(३) असल्यास, शासनाने खांदा वसाहतीच्या पुनर्विकासाकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१७) :** (१) सिडकोने यासंदर्भात वृत्त आल्याचे स्प्ष्ट केलेले असून सदर इमारतीची पहाणी करुन संरचना दुरुस्तीचे काम हाती घेवून ते मे, २०१७ मध्ये पूर्ण केलेले आहे.
(२) ते (४) प्रस्तुत प्रकरणी शासनाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सिडकोने बांधलेल्या धोकादायक झालेल्या इमारतींच्या पुनर्विकासासाठीचे विनियम दिनांक ४.२.२०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये अंतर्भूत केलेले होते. सदर विनियम सिडकोच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भूत करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१अेअे) अन्वये दिनांक ४.२.२०१५ रोजीच्या सूचनेन्वये नागरिकांच्या सूचना हरकती मागविणेत आलेल्या होत्या. यासंदर्भाने वैधानिक कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर शासनाने दिनांक १ आक्टोबर, २०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये सदर विनियम सिडकोच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भूत करणेस मंजूरी दिलेली आहे. यासंदर्भातील कार्यवाही पूर्ण झालेली आहे. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिका नियोजन प्राधिकरण असलेल्या क्षेत्राचे बाहेरील नवी मुंबईच्या अधिसूचित क्षेत्रामधील सिडकोने बांधलेल्या धोकादायक झालेल्या इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झालेला आहे. त्यानुसार खांदा वसाहत, कळंबोली येथील इमारतींचा पुनर्विकास होणे अभिप्रेत आहे.

---

### अहमदनगर जिल्ह्यात देशी गावठी कट्टे, पिस्तुले अशी घातक शस्त्रे बेकायदेशीररित्या बाळगणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

**(३५) ७६९९४ (२१-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात देशी गावठी कट्टे, पिस्तुले अशी घातक शस्त्रे बेकायदेशीररित्या बाळगणाऱ्यांची संख्या वाढत असून गत वर्षी ३८ गावठी कट्टे व ६० काडतुसे पोलिसांनी जप्त केल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बेकायदेशीर पिस्तुलांचा वापर हत्या करणे, वाळू तस्करी, रस्ता लूटी इत्यादीसाठी होत असल्यामुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थाचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन बेकायदेशीर पिस्तुल बाळगणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अहमदनगर जिल्ह्यात २०१६ मध्ये एकूण ३९ गुन्ह्यात देशी गावठी पिस्तुले, रिव्हॉल्वर असे एकूण ३५ अग्निशस्त्रे व ४ रायफल असे सर्व एकूण ३९ अग्नीशस्त्रे आणि ६६ काडतुसे जप्त केली असून सर्व आरोपींविरुध्द कायदेशीर कारवाई केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात महिलांसाठी "तेजस्विनी" बस सेवा सुरु करण्याबाबत

**(३६) ७७९३३ (२१-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात महिलांसाठी "तेजस्विनी" बस सेवा सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने महिलांसाठी "तेजस्विनी" बस सेवा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) होय.
(२) सद्यास्थितीत राज्यातील मुंबई, नवी मुंबई, ठाणे, नागपूर, कल्याण डोंबिवली,पुणे व पिंपरी-चिंचवड या महानगरपालिका क्षेत्रात "तेजस्विनी" बस योजना सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूरात होण्याबाबत**

**(३७) ७८४७९ (२१-०४-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूरात झाले पाहिजे या मागणीसाठी कोल्हापूर लेबर लॉ प्रॅक्टिशनर्स असोसिएशन व निवृत्त कामगारांनी दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजीच्या सुमारास साखळी उपोषण सुरु केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर येथे होणेबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१७) :** (१) नाही.

(२) मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ कोल्हापूर येथे स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस शासनामार्फत मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना शासन पत्र, दि.१७/७/२०१५ अन्वये करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) एमआयडीसीत बंदास्थेत असलेल्या वायमन गार्डन कंपनीच्या कामगारांची रक्कम परत देण्याबाबत**

**(३८) ७८७०७ (२१-०४-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) एमआयडीसीत सध्या बंद अवस्थेत असलेल्या वायमन गार्डन कंपनीच्या सुमारे ५५० कामगारांची गेली ३० वर्षापासून प्रलंबित असलेली रक्कम कामगारांना परत देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(२) असल्यास, कामगारांना त्यांच्या हक्काची रक्कम मिळण्यास होत असलेल्या विलंबामुळे कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कार्यवाही करुन कामगारांना न्याय देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०७-२०१७) :** (१) सदर कंपनी दिनांक ३०/१०/१९८६ पासून हायकोर्ट रिसीव्हर मार्फत सिल करण्यात आल्यानंतर सदरहु प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तेव्हापासून कंपनीचे सर्व व्यवहार कोर्ट रिसिव्हरकडुन नियंत्रित केले जात असल्याने याप्रकरणी शासनाने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) अशा प्रकारची कोणतीही तक्रार संबंधित सहायक कामगार कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण शहराचा विकास आराखडा रद्द करण्याबाबत**

**(३९) ७८७१८ (२१-०४-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण शहराचा विकास आराखडा तयार करतांना कोणत्याही प्रकारचा अभ्यास न करता निकष न ठरविता रुंदीकरणासाठी आवश्यक असलेल्या रस्त्यांकडे आराखडयात दुर्लक्ष करुन अनावश्यक रस्ते रुंदीकरणासाठी प्रस्तावित करण्यात आल्यामुळे तसेच रस्ता रुंदीकरणात काही मंदिरे व घरांचे नुकसान होणार असून राजकोटसारख्या परिसरात खेळासाठी मैदान व पार्किंगसाठी आरक्षण टाकण्यात आल्यामुळे मालवण शहरावर लादलेला अन्यायकारक शहर विकास आराखडा रद्द करण्याची मागणी मालवण शहरवासियांनी तसेच लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री ,यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शहराचा विकास आराखडा मालवण नगरपरिषदेने तयार केला असून या आराखडयाला आक्षेप घेणाऱ्या १६६२ हरकती नागरिकांनी नोंदविल्या असून उर्वरितांना हरकती नोंदविण्यासाठी मुदतवाढ देण्याची तसेच काही ठिकाणी मालवण शहरात ग्रीन झोन टाकण्यात येऊन मालवणच्या जनतेला अडचणीत आणणारा शहर विकास आराखडा बनविण्यात येणे, नविन विकास आराखडयामुळे मालवण शहरातील रहिवाश्यांनी त्यांची घरे व जमीनी बाधित होणार असल्याने सदर आराखडयास विरोध दर्शविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मालवण शहरातील बाजारपेठेचे अस्तित्व संपवण्याचे षडयंत्र असून पर्यटन, स्कुबा याचा कोणताही विचार झालेला नसणे, तसेच मासळी मार्केट रस्ता रुंदीकरण व विविध आरक्षणे याबाबत शहरवासियांचा सदर आराखडयास विरोध असल्याबाबतच्या अनेक तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींना प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संपूर्ण मालवण शहरात ९ ते १६ मीटरपर्यंतचे नऊ नवीन रस्ते प्रस्तावित असणे, तसेच ८२ नवीन आरक्षणे असून यातील सुमारे ६६ आरक्षणे खासगी जागेत दाखविण्यात येणे, त्याचप्रमाणे ४० टक्के भाग हा ग्रीन झोन व माड, काजू बागायती क्षेत्र असे आरक्षित करण्यात येणे, विकास आराखडयाविरोधात वायरी, आडवण, दांडी या भागातील शेकडो नागरिक व महिलांनी मालवण बाजारपेठ मार्गे मोर्चा काढून निषेध व्यक्त केला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर शहरवासियांवर लादलेला जाचक व अन्यायकारक मालवण विकास आराखडा तात्काळ रद्द करुन शहरवासियांना विश्वासात घेऊन हरकतीसाठी मुदतवाढ देऊन त्यांचे आक्षेप व सूचनांचा विचार करुन नव्याने विकास आराखडा तयार करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) मालवण शहर विकास आराखडा स्थगिती देऊन फेरविचार करण्याची मागणी विविध लोकप्रतिनीधींनी शासनाकडे केलेली आहे.

(२) होय.

सदर विकास आराखडा दि. १३ ते १९ ऑगस्ट २०१५ च्या राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर १६६२ हरकती व सुचना नियोजन समितीकडे प्राप्त झालेल्या आहेत व त्यावर नियोजन समितीने फेब्रुवारी २०१६ मध्ये सुनावणी घेतलेली आहे. सदर विकास योजना कलम ३० अन्वये शासनास मंजुरीसाठी सादर करण्यासाठी नगरपरिषद मालवणने विहित मुदतीत कार्यवाही न केल्याने सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी पत्र क्र. १५४५, दि. ०८/०९/२०१६ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१ (४क) अन्वये नामनिर्देशित अधिकारी म्हणून सहाय्यक संचालक, नगर रचना रायगड-अलिबाग यांची नेमणूक केलेली आहे. सदर विकास योजनेसंबंधीत प्राप्त हरकती व सूचनांबाबत नियोजन समिती/नामनिर्देशित अधिकारी यांचेकडे आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(३) अशा प्रकारच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनीधींना प्राप्त झाल्या आहेत किंवा नाही, याबाबतची माहिती शासनाकडे उपलब्ध झाल्याचे आढळून येत नाही.

(४) सदर प्रारुप विकास योजनेबाबत सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांचे कार्यालयात दि.२४/०७/२०१५ रोजी अध्यक्ष नगरपरिषद मालवण तसेच मुख्याधिकारी व इतर नगरपरिषदेचे पदाधिकारी यांचेसमवेत बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत नगरपरिषदेचे अध्यक्ष व पदाधिकारी यांनी सुचविलेले बदल प्रारुप विकास योजनेत अंतर्भूत करुन तद्नंतर सदर विकास योजना कलम २६ (१) प्रसिध्द करण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे नगरपरिषदेच्या सुचनेनुसार विकास योजनेत योग्य तो बदल करुन सदर बदलासह प्रस्तुत विकास योजना कलम २६ (१) अन्वये दि. १३ ते १९ ऑगस्ट २०१५ च्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली.

नागरिकांच्या मोर्चाबाबत माहिती आढळून येत नाही.

(५) विकास योजना शासनास सादर झाल्यानंतर उक्त तक्रारी, आक्षेप व सूचना विचारात घेवून योजनेच्या मंजूरीबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची शासनाची भूमिका आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलडाणा नगरपरिषद अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेच्या निधीतून बँकेच्या कर्जाचा भरणा व अन्य देयके प्रदान करून गैरव्यवहार करण्यात आल्याबाबत

**(४०) ७९७७१ (२०-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा नगरपरिषद अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेच्या निधीतून बँकेच्या कर्जाचा भरणा व अन्य देयके प्रदान करून गैरव्यवहार करण्यात आल्या बाबतचा अहवाल माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दोषी असलेल्या अधिकाऱ्यांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) होय, सामाजिक न्याय विभागाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी बुलडाणा यांनी याबाबतचा अहवाल सामाजिक न्याय विभागास दि.१७.१.२०१७ रोजी सादर केला आहे.
(२) विषयांकित प्रकरणाच्या अनियमिततेबाबत जबाबदार तत्कालीन मुख्याधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास सादर करण्याची बाब जिल्हास्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिजामाता क्रीडा संकुल बुलडाणा येथील व्यापारी गाळ्यासमोर झालेल्या स्फोटाबाबत**

**(४१) ८००६० (२१-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिजामाता क्रीडा संकुल बुलडाणा येथील व्यापारी गाळ्यासमोर मा.लोकसभा सदस्य यांच्या कार्यालयासमोर दिनांक ०३ फेब्रुवारी, २०१७ रोजी झालेल्या स्फोटात दोन श्वानांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे जानेवारी २०१७ वा त्यादरम्यान बुलडाणा येथील आठवडी बाजारात १५ गार्यीचा घातपाताने मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,तपासाअंती काय निष्पन्न झाले व पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१७) :** (१) व (२) दि. ०३ फेब्रुवारी, २०१७ रोजी झालेल्या स्फोटात एका श्वानाचा मृत्यू झालेला आहे. तसेच दि. ११ जानेवारी, २०१७ रोजी ३ गायी व २ गोऱ्हे मृत स्थितीत आढळले आहेत.
(३) सर्व मृत प्राण्यांचे शव विच्छेदन करुन पुढील तपासणी करिता अवयव, घटनास्थळावर प्राप्त द्रावण व व्हिसेरा वैज्ञानिक प्रयोगशाळा, औरंगाबाद येथे पाठविण्यात आले असून पुढील चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती येथील महिला व्यवसाय प्रशिक्षण अभियान या संस्थेकडून फसवणूक करण्यात आल्याबाबत**

**(४२) ८०३०६ (२१-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील अनेक कामगारांची अमरावती येथील महिला व्यवसाय प्रशिक्षण अभियान या संस्थेकडून मोठया प्रमाणात फसवणूक करण्यात आली असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधी व सदरहू तरुण कामगारांनी मा.जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामगारांची फसवणूक करणाऱ्या संस्थेवर कारवाई करण्याबाबत तसेच सदर तरुण कामगारांचे वेतन, भत्ते देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२६-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी संबंधीत कर्मचारी यांना त्यांचे थकीत वेतन व इतर देणी मिळण्याकरिता मा.कामगार न्यायालयात प्रकरण दाखल करण्याबाबत सरकारी कामगार अधिकारी, हिंगोली यांनी दि.२४.५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सुचित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील बांधकाम कामगारांची नोंद असूनही शासकीय योजनांपासून वंचित असल्याबाबत**

**(४३) ८०३५९ (२१-०४-२०१७). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी मंडळाची स्थापना करुन मंडळाच्या माध्यमातून विविध योजना सुरु केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा जिल्हयातील २ हजार ८२ कामगारांची नोंद असूनही हे कामगार शासकीय योजनांपासून वंचित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकाम कामगारांना शासकीय योजना मिळण्याकरिता शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२४-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सातारा जिल्ह्यातील मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांपैकी १००८ पात्र बांधकाम कामगारांना विविध १८ कल्याणकारी योजनांचा लाभ देण्याकरिता रु.३१,००,२००/- (एकतीस लाख दोनशे मात्र) वाटप करण्यात आले आहेत.

(३) नोंदीत बांधकाम कामगारांना मंडळाने लागू केलेल्या कल्याणकारी योजनांचा लाभ जलद गतीने मिळणेकरिता मंडळाच्या दिनांक १८.६.२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार संबंधित जिल्हा कार्यालय प्रमुखांना (अप्पर कामगार आयुक्त, कामगार उप आयुक्त, सहायक कामगार आयुक्त, सरकारी कामगार अधिकारी) योजनांचे लाभ वाटप करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील खर्डी येथे सुसज्ज पोलिस चौकी बांधण्याबाबत

**(४४) ८०३७४ (२१-०४-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील खर्डी पोलिस चौकीला १०० वर्षे पूर्ण झाली असून सदर ठिकाणी सुसज्ज पोलिस चौकी बांधण्याची मागणी तेथील नागरिकांनी वारंवार संबधित विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खर्डी येथे नविन पोलिस चौकी बांधण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१७) :** (१) व (२) खर्डी येथील पोलीस चौकीचे बांधकाम हे सन १९१२-१३ या साली झाले असून खर्डी येथील पोलीस चौकी सुमारे १०० वर्षे जूनी आहे. सदर चौकीच्या एकूण चार सुसज्ज खोल्या सुस्थितीत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर नगरपरिषदेच्या प्रारुप विकास आराखड्याची माहिती व नकाशा उपलब्ध न करता अधिसूचना जारी करण्याच्या निर्णयाबाबत

**(४५) ८०५२० (२१-०४-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर नगरपरिषदेच्या प्रारुप विकास आराखड्याची माहिती व नकाशा उपलब्ध न करता अधिसूचना जारी करण्याच्या शासन निर्णयाविरोधात प्रारुप विकास आराखडा विरोधी संघर्ष समितीने माहे डिसेंबर, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात मा.मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, आराखड्याची माहिती व नकाशा प्रसिध्द करण्याच्या दृष्टीने तसेच नागरिकांच्या हरकती व सूचना मागविण्यासंदर्भात नगरविकास विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) होय.

प्रारुप विकास आराखडा विरोधी संघर्ष समितीने पालघर विकास आराखडा हरकती संबंधी निवेदन मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दि. ५/४/२०१७ रोजी सादर केले आहे.
(२) व (३) पालघर नगरपरिषदेची विकास योजना शासनाने दिनांक २/९/२०१६ च्या अधिसूचनेद्वारे भागश: मंजूर केली असून, वगळलेल्या भागाची (ई.पी. १ ते ४९) सूचना आम जनतेकडून हरकती/सूचना मागविण्यासाठी दि.२/९/२०१६ रोजी पुनर्प्रसिध्द केली आहे. त्यावेळी सदर सूचना व अधिसूचनेसोबत योजनेचे नकाशे उपलब्ध झाले नव्हते. तथापि, त्यानंतर सदर नकाशे प्रमाणित करुन आम नागरिकांच्या अवलोकनार्थ दि.७/३/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत.

उक्त वगळलेल्या भागाच्या विकास योजनेवर आम जनतेकडून हरकती/सूचना दाखल करण्यासाठी सहसंचालक, नगर रचना, कोकण भवन, नवी मुंबई यांना अधिकारी म्हणून नेमण्यात आले असून पुढील कार्यवाही त्यांचे स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इचलकरंजी नगरपरिषद हद्दीमध्ये मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी शास्ती रक्कम आकारण्यात येत असल्याबाबत

**(४६) ८०८६४ (२१-०४-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इचलकरंजी नगरपरिषद हद्दीमध्ये अवैध बांधकामांना आळा घालण्यासाठी त्या बांधकामांवर मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी शास्ती रक्कम आकारून घरफाळा आकारणेस सुरवात केल्यामुळे अनेक मालमत्ताधारकांना तिप्पट घरफाळयाची बिले प्राप्त झाल्याने सदर शास्ती रद्द करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्री महोदयांकडे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी नगरविकास विभाग शासन निर्णय दिनांक २८/०९/२०१५ अन्वये सचिव, नगरविकास-२ यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीने उक्त निवेदनाच्या अनुषंगाने इचलकरंजी येथील परिस्थितीबाबत माहिती / अभिप्राय घेतला आहे काय व सदर अभिप्राय शासनाला प्राप्त झाला आहे काय व त्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अ मधील तरतूदी नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सर्व असंघटीत घटकांना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी एकच असंघटीत कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्याबाबत**

**(४७) ८०८७२ (२१-०४-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व असंघटीत घटकांना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी एकच असंघटीत कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील असंघटीत क्षेत्रातील कामगार कल्याण मंडळात यंत्रमाग कामगार, शेतमजूर, पत्रकार व वृत्तपत्र विक्रेते, रिक्षाचालक, ट्रकचालक, वाहनचालक यांनाही समाविष्ट करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा.कामगार मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रस्तावाची सध्यस्थिती काय आहे व केव्हापर्यंत हा प्रस्ताव मंजूर होणे अपेक्षित आहे ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२४-०७-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) होय, असंघटीत कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा मंडळ गठीत करण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीपथावर आहे.

---

**वसई-विरार शहर महानगरपालिका व वसई-विरार उपप्रदेशाकरीता औद्योगिक क्षेत्रामध्ये रहिवास व वाणिज्य वापर अद्यापी अनुज्ञेय करण्यात आलेला नसल्याबाबत**

**(४८) ८१४८५ (२०-०४-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिका व उपप्रदेशाकरीता मंजुर विकास आराखड्यामधील दर्शविलेल्या औद्योगिक क्षेत्रामध्ये रहिवास व वाणिज्य वापर अद्यापी अनुज्ञेय करण्यात आलेला नाही ही बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्र्याना पत्र लिहून निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम.एम.आर क्षेत्रातील महानगरपालिका क्षेत्रामध्ये विकास आराखड्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये रहिवास व वाणिज्य वापर अनुज्ञेय केल्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका व उपप्रदेशासाठीचे क्षेत्रात रहिवास व वाणिज्य वापर अनुज्ञेय करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) होय.
(२) मुंबई महानगर प्रदेशातील बृहन्मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिका क्षेत्रामधील सिडकोचे क्षेत्र वगळून इतर सर्व महानगरपालिकांसाठी सर्वसमावेशक व एकात्मिकृत विकास नियंत्रण नियमावलीची सूचना दिनांक २८/२/२०१७ रोजी प्रसिध्द केली आहे. सदरची नियमावली वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रास देखिल लागू आहे. या प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीमध्ये औदयोगिक क्षेत्रामध्ये रहिवास व वाणिज्य वापर अनुज्ञेय करण्याबाबतची तरतूद अंतर्भूत करण्याचे प्रस्तावित केले आहे. सदर नियमावली अंतिमरीत्या मंजूर झाल्यानंतर लागू होईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम जिल्हयातील मालेगांव नगर पंचायतला वैशिष्टयापुर्ण योजनेतून वगळण्यात आल्याबाबत

**(४९) ८१६६९ (२०-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव ग्रामपंचायतचे रुपातंर दिनांक १७ जुलै, २०१५ रोजी नगरपंचायतमध्ये झाले मात्र १ वर्ष ६ महिन्यांचा कालावधी उलटुनही मालेगांव नगरपंचायतच्या विकासाकडे शासनाने लक्ष दिले नसून वैशिष्टयपुर्ण योजनेंतर्गत वाशिम जिल्हयातील इतर सर्व नगरपालिका व नगरपंचायतींना कोटयावधी रुपयांचा विकास निधी मंजुर झाला असतांना मालेगांव नगरपंचायतला मात्र त्यामधून वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालेगांव शहराच्या विकासाठी वैशिष्टयपुर्ण योजनेंतर्गत निधी उपलब्ध करण्यासाठी शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) मालेगांव नगरपंचायतीस सन २०१५-१६ मध्ये रस्ता अनुदान रु.२० लक्ष मंजुर केले आहे. तसेच सन २०१६-२०१७ मध्ये रस्ता अनुदान रु.२० लक्ष व नवी नगरपंचायत योजनेखाली रु.२.२५ कोटी मंजूर करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**अहमदनगर महानगरपालिकेला मुलभूत सोयीसोविधा अंतर्गत विकास कामासाठी निधी मिळण्याबाबत**

**(५०) ८३११९ (२०-०४-२०१७). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महानगरपालिकेला मुलभूत सोयीसोविधा अंतर्गत विकास कामासाठी सन २०१४ मध्ये रुपये ५ कोटी ४० लक्ष रक्कम देण्यात आली होती व त्यातील काही हिस्सा न दिल्याने काही कामे अर्धवट स्वरुपात बंद पडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामासाठी निधी वर्ग करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) व (२) अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांकरीता रु.६.८० कोटी मंजूर करण्यात आले आहेत. तथापि, उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेऊन ८०% च्या मर्यादेत दोन टप्प्यात एकूण रु.५.४४ कोटी वितरीत करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.